प्रकरण चार

पशुसंवर्धन विभाग (परिच्छेद क्रमांक 4.496 ते 4.520)

4.496 विशेष घटक योजना अनुसूचित जाती उपाययोजना अंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना 75 टक्के अनुदानावर दोन दुधाळ जनावरांचा गट वाटप करणेबाबत.

पंचायत समिती श्रीवर्धन, जिल्हा रायगड, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 8)

पंचायत समिती श्रीवर्धन यांनी सन 2021-22 मध्ये पशुसंवर्धन विभागाकडील विशेष घटक योजना अनुसूचित जाती उपाययोजना अंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना 75 टक्के अनुदानावर दोन दुधाळ जनावरांचा गट वाटप करणे कामी 3 लाभार्थ्यांच्या खाती एकूण रक्कम रुपये 1,91,388/- वर्ग केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/ पदुम-4 दिनांक 22/11/2011 मधील नियम 1 नुसार अंमलबजावणी अधिकाऱ्याने सर्व प्रकारच्या प्रसिद्धी माध्यामाद्वारे व्यापक प्रसिद्धी दिल्याबाबत कागदपत्रे सोबत उपलब्ध झाली नाहीत.

2. उपरोक्त नमूद शासन निर्णय दिनांक 22/11/2011 मधील नियम 16 आणि निवड समिती व जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, रायगड यांचे खरेदी निर्देशातील अट क्रमांक 7 नुसार प्रथम 1 जनावर व 6 महिन्यानंतर दुसरे जनावर घेण्याची तरतूद असताना दोन्ही जनावरे एकदम खरेदी करुन संबंधित लाभार्थ्याला संपूर्ण रक्कम वर्ग केली आहे.

3. उपरोक्त शासन निर्णयातील 18 नुसार संबंधित पशुवैद्यकीय संस्थेद्वारे जनावरांची स्वतंत्र नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात यावी. त्यामध्ये दुध उत्पादन, माज दाखविल्याचा दिनांक, कृत्रिम रेतनाचा दिनांक, गर्भ तपासणी दिनांक व निष्कर्ष, व्याल्याचा दिनांक इत्यादी नोंदी घेतल्याची नोंदवही उपलब्ध केली नाही.

4. पंचायत समितीने लाभार्थींची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे सदर लाभार्थ्यांना दुबार लाभ दिल्याबाबत तपासणी करता आली नाही.

5. कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/ पदुम-4 दिनांक 22/11/2011 मधील नियम 11 नुसार एच.एफ., जर्सी या संकरीत गायी तसेच मुऱ्हा व जाफराबादी या सुधारित जातीच्या म्हशी प्रतिदिन 10 ते 12 लिटर दुध उत्पादन असलेल्या असाव्यात, मात्र सदरच्या गायी/म्हशी प्रतिदिन 10 ते 12 लिटर दुध देत असलेबाबत दुध काढताना फोटो घेऊन नस्ती सोबत जोडलेले नाहीत. त्यामुळे खरेदी केलेल्या गायी / म्हशी दुधाळ असलेबाबत तपासणी करता आली नाही.

6. सदर योजनेचे मूल्यमापन करुन फलश्रुती अहवाल / उपयोगिता प्रमाणपत्रे सादर केली नाहीत.

4.497 जिल्हा स्तरीय अनुसूचित जाती उपयोजना/आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजने अंतर्गत 10+1 शेळी गट पुरवठा योजनेतील अनियमितता.

पंचायत समिती शिरपूर, जिल्हा धुळे, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 27)

पंचायत समिती धुळे यांनी सन 2021-22 मध्ये कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सयव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/ पदुम-4, दिनांक 22.11.2011 नुसार राज्यात अंशत: ठाणबंद पध्दतीने शेळीपालन अंतर्गत 10 शेळी +1 बोकड 75 टक्के अनुदानावर गट पुरवठा करणे, उस्मानाबादी / संगमनेरी जातीच्या शेळीची आधारभूत किंमत प्रति शेळी रुपये 6,000/- तर बोकडाची आधारभूत किंमत प्रति बोकड रुपये 7,000/- आणि स्थानिक शेळीची किंमत प्रति शेळी रुपये 4,000/- व बोकडाची प्रति बोकड रुपये 5,000/- प्रमाणे खर्चास मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार रुपये 24,93,365/- खर्च करण्यात आला असून त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. निवड केलेल्या लाभार्थी प्रस्तावाची पडताळणी केली असता श्रीमती रेखाबाई नारसिंग पावरा, जामन्यापाडा यांचे प्रस्तावाला जोडलेल्या अभिलेख्यानुसार त्यांचे जन्म दिनांक 01.11.1982 असून त्यांना रेंशनकार्डानुसार 5 अपत्य आहेत. शासन निर्णय 2003 नुसार 3 अपत्य असलेले लाभार्थी यांना लाभ देता येत नाही. रक्कम रुपये 53,429/- वसुल करणे आवश्यक आहे.

2. सदर योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शन सुचना नंबर 20 व 21 प्रमाणे कार्यवाही केली नाही.

4.498 आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजनांतर्गत अनुसूचित जमातीच्या कुटुंबाना दुधाळ गट पुरवठ्यामधील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती शिंदखेडा, जिल्हा धुळे, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 11)

पंचायत समिती शिंदखेडा यांचे सन 2021-22 चे लेखापरीक्षणात आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजनांतर्गत अनुसुचित जमातीच्या कुंटुबांना दुधाळ गट पुरवण्यासाठी रक्कम रुपये 10,20,736/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22 नोव्हेंबर 2011 नुसार योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचनेतील अनुक्रमांक 6 नुसार लाभार्थ्यांकडुन दरवर्षी जून/जुलै मध्ये अर्ज मागविण्यात यावेत. अर्ज स्विकारण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात यावी. या मुदतीनंतर अर्ज स्विकारु नये. तसेच सुचनेतील अनुक्रमांक 5 नुसार लाभार्थी अर्ज समितीच्या मान्यतेसाठी सादर करावेत. प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची तारीख निहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यात यावी. तसेच अनुक्रमांक 7 नुसार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हाधिकारी यांचे संकेतस्थळावर योजनेची निवड यादी उपलब्ध करुन देण्यात यावी. अशी कार्यवाही केली नाही.

2. कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22 नोव्हेंबर 2011 नुसार लाभार्थी निवडीच्या निकषा प्रमाणे कार्यवाही केलेबाबतचे दस्ताऐवज नस्ती सोबत जोडण्यात आलेले नाही, सदरचे दस्ताऐवज उपलब्ध करुन पुर्तता करावी.

3. मार्गदर्शक सूचनेतील अ.क्र.4 नुसार विकलांग लाभार्थींना या योजनेंतर्गत लाभ देण्यात यावा तथापि याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

4. अनुक्रमांक 11 नुसार दुधाळ गट खरेदी समितीमध्ये तालुका पशुधन अधिकारी, कार्यक्षेत्रातील पशुवैदयकीय दवाखान्याचे प्रमुख, बँक प्रतिनिधी, विमा प्रतीनिधी व लाभार्थी आवश्यक आहे. दुधाळ गट खरेदी बिलाचे प्रदान पंचायत समितीने दिनांक 31.03.2022 रोजी केले असून व प्रत्यक्ष शेळी खरेदीचे उपप्रमाणके वेगळ्या दिनांकाचे आहे. विमा कंपनीचा विमा वेगळ्या तारखेचा असल्याने प्रत्यक्ष दुधाळ गट खरेदी तारखेला विमा उतरविणे आवश्यक असताना उशिरा विमा उतरविलेला आहे. म्हणजेच प्रत्यक्ष दुधाळ गट खरेदी व प्रत्यक्ष विमा उतरविल्याच्या दिनांकामध्ये तफावत आहे. यावरुन सदर खरेदी, समिती गठीत करुन केलेली नाही.

5. मुद्दा क्रमांक 22 लाभार्थी यांनी हा व्यवसाय 3 वर्ष करणे आवश्यक राहील. तसेच मुद्दा क्रमांक 25 नुसार योजने अंतर्गत 5 वर्षासाठी लाभ देण्यात येवू नये तसेच मुद्दा क्रमांक 18 नुसार योजना अंमलबजावणी अधिकारी यांनी लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची यादी अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, प्रकल्प विभाग, जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना पाठविण्यात यावी. तसेच कार्यक्षेत्रातील पशु वैद्यकीय दवाखाना व संबंधीत ग्रामपंचायत यांनी लाभार्थ्यांची स्वतंत्र नोंदवही ठेवावी. यासाठी अशा लाभार्थ्यांची यादी संबंधीत ग्रामपंचायत व इतर संस्थाना पाठविल्याची स्वतंत्र नोंदवहीत नोंद घ्यावी. याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4.499 विशेष घटक योजने अंतर्गत आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजनांतर्गत अनुसूचित जमातीच्या कुटुंबाना दुधाळ गट पुरवठ्या मधील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती शिंदखेडा, जिल्हा धुळे, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 12)

पंचायत समिती शिंदखेडा, जिल्हा धुळे यांचे सन 2021-2022 चे लेखापरीक्षणात विशेष घटक योजने अंतर्गत आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजनांतर्गत अनुसुचित जमातीच्या कुंटुबांना दुधाळ गट पुरवठयासाठी रककम रुपये 10,68,580/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11 नोव्हेंबर 2011 नुसार योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचनेतील अनुक्रमांक 6 नुसार लाभार्थ्यांकडुन दरवर्षी जून/ जुलै मध्ये अर्ज मागविण्यात यावेत. अर्ज स्विकारण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात यावी. या मुदतीनंतर अर्ज स्विकारु नये. तसेच सुचनेतील अनुक्रमांक 5 नुसार लाभार्थी अर्ज समितीच्या मान्यतेसाठी सादर करावेत. प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची तारीख निहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यात यावी. तसेच अनुक्रमांक 7 नुसार जिल्हा पशुसंवर्धन, अधिकारी जिल्हा परीषद, धुळे यांचे संकेतस्थळावर योजनेची निवड यादी उपलब्ध करुन देण्यात यावी.अशी कार्यवाही केली नाही.

2. कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11 नोव्हेंबर 2011 नुसार लाभार्थी निवडीच्या निकषा प्रमाणे कार्यवाही केलेबाबतचे दस्ताऐवज नस्ती सोबत जोडण्यात आले नाही.

3. कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11 नोव्हेंबर 2011 अनुक्रमांक 11 नुसार शेळी खरेदी गट समितीमध्ये विमा प्रतीनिधी आवश्यक आहे. शेळी खरेदी बिलाचे प्रदान पंचायत समितीने दिनांक 15.10.2020 ते 31.03.2021 व प्रत्यक्ष शेळी खरेदीचे उपप्रमाणके दिनांक 19.10.2021 व 30.03.2022 या तारखेचे आहे. व विमा कंपनीचा विमा दिनांक 20.09.2022 व 19.09.2025 या तारखेत असल्याने प्रत्यक्ष शेळी खरेदी तारखेला विमा न उतरविता उशिरा विमा उतरविलेला आहे. म्हणजेच प्रत्यक्ष शेळी खरेदी व प्रत्यक्ष विमा उतरविल्याच्या दिनांकामध्ये तफावत दिसुन येते. यावरुन सदर खरेदी समिती गठीत करुन खरेदीची कार्यवाही केलेली नाही.

4. कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11 नोव्हेंबर 2011 नुसार मुद्दा क्रमांक 18 लाभार्थी यांनी हा व्यवसाय 3 वर्ष करणे आवश्यक राहील. तसेच या योजने अंतर्गत 5 वर्षासाठी लाभ देण्यात येवू नये यासाठी अशा लाभार्थ्यांची यादी संबंधीत ग्रामपंचायत, व इतर संस्थाना पाठविण्यात यावी व लाभार्थ्यांची नोंद शेळी गटाच्या तपशिलासह स्वतंत्र नोंदवहीत घ्यावी. अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5. कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11 नोव्हेंबर 2011 मधील अनुक्रमांक 25 नुसार योजनेमध्ये लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीत दिलेल्या गटापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे अभिलेखे ठेवण्यात यावेत व योजने अंतर्गत केलेल्या कार्यवाही बाबतच्या नोंदी नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थेकडे ठेवण्यात याव्यात. अनुक्रमांक 26 नुसार योजना कालावधी संपल्यानंतर 6 महिन्यांनी योजनेचे मुल्यमापन नेमुन दिलेल्या समिती मार्फत करतील तथापि याप्रमाणे मुल्यमापन अहवाल नस्तीमध्ये नसल्याने योजनेचा उद्देश सफल झाल्याचे आढळून आले नाही.

4.500 पशुधन पर्यवेक्षक सेवापुस्तकाचे त्रुटीबाबत.

पंचायत समिती नवापुर, जिल्हा नंदुरबार, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 9)

पंचायत समिती नवापुर येथील सन 2021-22 पशुसंवर्धन विभागाकडील वेतन देयक व सेवा पुस्तकाची पडताळणी केली असता एका पशुधन पर्यवेक्षक यांची 7 वा वेतन आयोग नियमित व एकस्तर वेतन निश्चित करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. पशुधन पर्यवेक्षक यांना आदेश क्रमांक जा.क्र./जिपन/पस/आस्था-1/500, दिनांक 17/10/2018 अन्वये दिनांक 18/10/2015 पासुन आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ दिला आहे. त्यानुसार 18/10/2015 रोजी सेवापुस्तकात आश्वासीत प्रगती योजनेची नोंद घेऊन व वेतन निश्चिती करणे आवश्यक असताना तसे न करता एकस्तर वेतनाचा लाभ दिला आहे व अद्याप एकस्तर वेतन प्रमाणे 01/07/2021 पर्यन्त सेवापुस्तकात वेतन वाढ करण्यात आली आहे. तसेच आश्वासीत योजना लाभाची नोंद सेवापुस्तकात नोंदविण्यात आली नाही. सदर नोंद घेऊन योग्य पद्धतीने वेतन निश्चिती करणे आवश्यक आहे.

2. 7 वा वेतन आयोगाच्या दिनांक 01/01/2016 ते 31/05/2019 या कालावधीच्या वेतन निश्चिती फरक रकमांची पडताळणी केली असता मुळ परिच्छेदात नमूद केलेनुसार अहवालासोबतचे परिशिष्ट-1 प्रमाणे रक्कम रुपये 1,35,240/- जादा प्रदान करण्यात आले आहे. सदर रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

3. वेतन बिलाची तपासणी केली असता सदर कर्मचाऱ्यास वेतन योग्य रित्या म्हणजेच मे 2021 मुळ वेतन रुपये 44,100/- फेब्रुवारी 2022 मुळ वेतन रक्कम रुपये 45,400/- प्रदान केले आहे. त्यानुसार माहे जुलै 2019 ते मार्च 2021 या कालावधीतील वेतन नियमानुसार प्रदान केल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

4.501 पशुधन पर्यवेक्षक यांना जादा वेतन प्रदानाबाबत.

पंचायत समिती नवापुर, जिल्हा नंदुरबार, सन 2021-2022, (परिच्छेद क्रमांक 10)

पशुसंवर्धन विभागाकडील वेतन देयक व सेवा पुस्तकाची पडताळणी केली असता एका पशुधन पर्यवेक्षक यांची 7 वा वेतन आयोग नियमित व एकस्तर वेतन निश्चिती केली आहे. त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. सदर कर्मचारी यांना 01/01/2016 ची 7 वा वेतन आयोगामप्रमाणे वेतन निश्चिती करुन मुळ वेतन 31,900/- असणे आवश्यक असताना सेवापुस्तकात दिनांक 01/01/2016 रोजी रुपये 33,000/- नोंद केल्याने जादा वेतनवाढ नमुद करण्यात आली आहे.

2. 7 वा वेतन व 6 वा वेतन आयोग प्रदान फरक विवरणा नुसार जानेवारी 2016 ते डिसेंबर 2018 या कालावधीत केलेले प्रदान अचुक आहे. तथापि, जानेवारी 2019 ते फेब्रुवारी 2022 कालावधीत मुळ परिच्छेदात नमूद केलेनुसार अहवाला सोबतचे परिशिष्ट-2 प्रमाणे रक्कम रुपये 51,966/- जादा वेतन अदा केल्याने सदर रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

4.502 अनुसूचित जाती व उपजाती उपयोजनेंतर्गत 75 टक्के अनुदानावर 10+1 शेळी गट वाटप योजनेतील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती राधानगरी, जिल्हा कोल्हापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 14)

पंचायत समिती राधानगरी यांनी सन 2021-22 मध्ये पशुसंवर्धन विभागाकडील अनुसुचित जाती व उपजाती उपयोजनेंतर्गत 75 टक्के अनुदानावर 10+1 शेळी गट वाटप योजनेंतर्गत प्रतिलाभार्थी रुपये 53,429/- प्रमाणे 26 लाभार्थ्यांना रुपये 13,89,154/- अनुदान वाटप केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 नुसार या योजनेंतर्गत 10+1 शेळयांच्या गटासाठी अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गातील लाभार्थींना 75 टक्के अनुदान म्हणजेच उस्मानाबादी/संगमनेरी साठी रुपये 53,429/- व स्थानिक गटासाठी रुपये 35,886/- अनुदान निश्चित केले आहे. तथापि खरेदी पावतीवर संबंधित शेळी गट हा कोणत्या जातीचा आहे याचा उल्लेख नसताना प्रती लाभार्थीस रुपये 53,429/- प्रमाणे अनुदान अदा केले आहे.

2. उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना 1 नुसार अंमलबजावणी अधिकाऱ्याने या योजनेस प्रसिद्धी माध्यमाद्वारे व्यापक प्रसिद्धी दिलेचे लेखे उपलब्ध झाले नाहीत.

3. लाभ दिलेल्या लाभार्थ्यांचे अर्ज तसेच लाभार्थ्यांची निवड यादी लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेने पात्र लाभार्थ्यांचीच निवड केल्याचे कळून येत नाही. वरील शासन निणर्यातील मार्गदर्शक सूचना क्रमांक 4 व ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपऊ-2018/प्र.क्र.54/वित्त-3, दिनांक 25 जून 2018 नुसार 5 टक्के दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ दिल्याची खातरजमा करता आली नाही.

4. वरील शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना 5 नुसार सर्व अर्जाची तारीखनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवलेली नाही.

5. वरील शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना 10 नुसार शेळी/बोकडांची खरेदी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेती विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे यांचेकडून करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केली नाही. तसेच महामंडळाकडे शेळ्या/बोकड उपलब्ध नसलेचे लेखे उपलब्ध झाले नाहीत.

6. उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना 14 नुसार लाभार्थ्याने शेळी/मेंढी पालन विषयक प्रशिक्षण घेणे आवश्यक असताना लाभार्थ्यांचे कोणतेही दस्तऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

7. वरील शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना 21 नुसार पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी त्यांच्या तालुक्यात वाटप केलेल्या शेळी गटाच्या 25 टक्के गटांची तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त आणि जिल्हा पशुधन अधिकारी, जिल्हा परिषद 10 टक्के शेळी गटांची अचानकपणे प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही.

4.503 दुधाळ गट जनावरे 75 टक्के अनुदानावर वाटप करणेबाबत. (जिल्हा परिषद सेस)

पंचायत समिती आजरा, जिल्हा कोल्हापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 10)

पंचायत समिती आजरा यांनी सन 2021-22 मध्ये जिल्हा परिषद सेस मधून पशुसंवर्धन विभागाकडून 75 टक्के अनुदानावर 2 दुधाळ जनावरांचा गट अनुदान वाटप योजनेंतर्गत 11 लाभार्थ्यांना लाभ दिला असून एकूण रक्कम रुपये 7,01,756/- इतके अनुदान वाटप केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील मार्गदर्शक सूचना क्रमांक 11 नुसार एच.एफ./जर्सी या संकरीत तसेच मुऱ्हा व जाफराबादी या म्हैशी वाटप करण्यात याव्यात असे असताना लाभार्थ्यांनी खरेदी केलेल्या पशुधन पावतीवर गायी/म्हशींचे जातीचा उल्लेख अमराठी भाषेमध्ये असल्याने पशुधनाची जात समजून येत नाही.

2. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक 2011/प्र.क.323 /पदुम-4 दिनांक 11 नोव्हेंबर 2011 मधील मुद्दा क्रमांक 5 नुसार प्राप्त अर्जाची तारीखनिहाय नोंद ठेवलेली नाही तसेच मुद्दा क्रमांक 9 नुसार व गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवणेत आली नाही.

3. वरील शासन निर्णय दिनांक 22/11/2011 नुसार पशुधन विकास अधिकारी (विस्तार) तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अनुक्रमे 25 टक्के व 10 टक्के प्रत्यक्ष पडताळणी केलेबाबत जिल्हा पशुसंवर्धन आयुक्त यांना अहवाल सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

4. संबंधित लाभार्थ्यांच्या नस्तीमध्ये/प्रस्तावामध्ये दारिद्र्य रेषेखालील दाखला, अत्यल्प भूधारक दाखला, 7/12 उतारे, लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नसणे इत्यादी उणीवा आहेत.

5. खरेदी समिती अहवालावर पदाधिका-यांच्या स्वाक्ष-यां घेण्यात आलेल्या नाहीत.

6. लाभार्थी यांना दिलेल्या योजनेपासुन मिळणाऱ्या उत्पन्नाचे अभिलेख दप्तरी उपलब्ध झाले नाहीत. त्याकारणे संबंधितांचे आर्थिक स्तर उंचावून जीवनमान सुधारलेबाबत पडताळणी करता येत नाही.

7. वरील शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचना क्रमांक 1 नुसार अंमलबजावणी अधिकाऱ्याने या योजनेस प्रसिध्दी माध्यमाद्वारे व्यापक प्रसिद्धी देऊन लाभार्थीकडून अर्ज मागविणे आवश्यक असता अशी व्यापक प्रसिद्धी दिल्याचे अभिलेख आढळले नाहीत.

4.504 विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती/जमाती मधील लाभार्थींना 10+1 शेळी गट, 75 टक्के अनुदान वाटपामधील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती चंदगड, जिल्हा कोल्हापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 8)

पंचायत समिती चंदगड यांनी सन 2021-22 विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जाती/जमाती मधील लाभार्थ्यांना 10+1 शेळी गट, 75 टक्के अनुदान तत्वावर पुरविणे ही योजना राबवली आहे. एकूण 24 लाभार्थ्यांना रुपये 12,82,296/- अनुदान वितरीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 नुसार सक्षम प्राधिकारी यांनी दर तीन महिन्यांनी पशुपालकांच्या घरी जावून 100 टक्के पडताळणी केलेबाबतचे अहवाल लेखापरिक्षणास सादर केले नाहीत.

2. वरील शासन निर्णयातील अट क्रमांक 28 प्रमाणे पशुसंवर्धन उप आयुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद यांनी जिल्ह्यात फिरतीच्यावेळी वाटप शेळी गटाच्या 25 टक्के गटाची अचानकपणे पडताळणी केलेली नाही व तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर केला नाही.

3. वरील शासन निर्णयातील अट क्रमांक 25 प्रमाणे लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीत दिलेल्या गटापासुन मिळणाऱ्या उत्पन्नाचे अभिलेख ठेवले नाहीत.

4. वरील शासन निर्णयातील अट क्रमांक 2 नुसार एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ दिल्याची खात्री करता आली नाही.

5. वरील शासन निर्णयातील अट क्रमांक 21 नुसार पशुधन विस्तार अधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यात वाटप केलेल्या 25 टक्के गटांची व जिल्हा पशुधन अधिकारी यांनी अट क्रमांक 18 नुसार तो व्यवसाय चालू असलेबाबत पडताळणी /दाखले दिले नाहीत.

6. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1089/प्र.क्र.553/64/05 दिनांक 05/10/1989 अन्वये लाभार्थ्यांचे लाभार्थी निहाय गावनिहाय जिल्हास्तरावर मास्टर नोंदवही ठेवणेत आलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ दिला नसल्याबाबत खात्री करता आली नाही.

4.505 विशेष घटक योजना अंतर्गत 75 टक्के अनुदानावर शेळी गट वाटप खर्चातील अनियमितता.

पंचायत समिती अमरावती, जिल्हा अमरावती, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 3)

पंचायत समिती अमरावतीने सन 2021-22 मध्ये विशेष घटक योजनेंतर्गत 75 टक्के अनुदानावर 40 लाभार्थ्यांना शेळी गट वाटप करणे योजनेवर एकूण रक्कम रुपये 14,04,314/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2016/प्र.क्र.9/वित्त-9 दिनांक 19 मे 2016 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजनेचे काटेकोरपणे नियोजन करणे तसेच सदर निधी नियमानुसार व निकषानुसार

खर्च करणे व विहीत कालमर्यादेमधे खर्च होईल व योजनांचा लाभ लाभार्थ्यांना वेळेत मिळेल याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागाची असताना विभागाने शासन निर्णयाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी न केल्याने योजनेचा उद्देश सफल झाल्याचे दिसून आले नाही.

2. योजनेतील निवडक अर्जांची पडताळणी केली असता एका लाभार्थीने शेळीगट वाटपचा लाभ घेतलेला आहे, तथापि नस्तीला म्हशीसोबत लाभार्थ्याचा फोटो जोडला असल्याने शेळी गट खरेदी केली नसल्याचे स्पष्ट होते तरी सदरची रक्कम रुपये 33,750/- संबंधिताकडून वसुल करून शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

3. शेळी गट खरेदी केल्याचा व विमा काढल्याचा दिनांक यात मोठा कालावधी घेतलेला आहे. म्हणजे विमा एक ते तीन महिने उशिरा काढल्याचे दिसून येते. जनावरे खरेदी केल्याच्या दिनांकापासून विमा संरक्षण देणे लाभार्थ्यांच्या दृष्टीने आवश्यक आहे. विलंब झालेल्या कालावधीत जनावर दुर्घटनाग्रस्त व दगावल्यास त्याबाबत जबाबदारी निश्चित करता येत नाही. याबाबत कोणताही पुरावा नस्तीत उपलब्ध झालेला नाही.

4. सदर योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सदर लाभार्थ्यांना शेळी पालन संगोपन प्रशिक्षण देणे आवश्यक असताना तशाप्रकारे प्रशिक्षण देण्यात आले नाही. तसेच उपयोगिता प्रमाणपत्रे घेण्यात आली नाही.

5. लाभार्थ्यांची गावनिहाय मास्टर रजिस्टर अद्यावत ठेवण्यात न आल्याने एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6. सदर योजनेसाठी मार्गदर्शक सुचनेनुसार पशुधन विकास अधिकारी यांचे दर तीन महीन्यांनी जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करणे आवश्यक असताना असे अहवाल लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाही.

4.506 एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम अंतर्गत लाभार्थ्यांना 50 टक्के अनुदानावर तलंग गट वाटप करणे योजनेतील अनियमिततांबाबत.

पंचायत समिती कळमेश्वर, जिल्हा नागपूर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 2)

पंचायत समिती कळमेश्वर यांनी सन 2021-22 मध्ये एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम अंतर्गत लाभार्थ्यांना 50 टक्के अनुदानावर तलंग गट वाटप करणे योजनेतंर्गत सहायक गट विकास अधिकारी यांचे पत्र क्रमांक पसक/तलंग गट/4/2022, दिनांक 14.01.2022 अन्वये कावेरी क्रॉस जातीचे 500 ग्रॅम वजन, दर प्रती पक्षी रुपये 107/- प्रमाणे 77 गट (25+3) पुरवठा आदेश देवुन रक्कम रुपये 3,17,576/- पुरवठा धारकास अदा केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2016/ प्र.क्र.171/पदुम-4, दिनांक 12.12.2017 अन्वये एक दिवसीय व विविध वयोगटाचे कुक्कुट पक्षी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ, मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, सघन कुक्कूट विकास गट, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, इतर शासकीय संस्था व शासन अंगीकृत उपक्रम यांचेकडुन खरेदी केल्यास थेट लाभ हस्तांतरणामधुन वगळण्यात आले. परंतु पंचायत समितीने उपरोक्त तलंग गटाची खरेदी शासकीय संस्थेऐवजी खाजगी पुरवठाधारकाकडुन केली आहे. शासन निर्णयानुसार खरेदी प्रक्रियाऐवजी थेट लाभ हस्तांतरण पध्दतीने लाभार्थीचे बँक खात्यामध्ये पैसे जमा करणे आवश्यक असताना सदर कार्यवाही न करता खरेदी प्रक्रियेद्वारे तलंग गट खरेदी केले आहेत.

2. पक्षी खरेदी बाबत पंचायत समितीने स्थानिक पुरवठाधारकाऐवजी पुणे येथील पुरवठाधारकाकडुन दरपत्रक मागविली आहेत. तीनही पुरवठाधारकांनी पंचायत समितीस सादर केलेले दरपत्रकात तलंग गट किंवा कुकूट पक्षी यांचे दर नमुद केले नाहीत. पुरवठाधारकाने दरपत्रकात दर नमुद केले नसताना पशुधन विकास अधिकारी, सहायक गट विकास अधिकारी व गट विकास अधिकारी या निविदा समितीने दिनांक 14.01.2021 रोजी मे. करण ट्रेडींग यांची निविदा मंजुर केली आहे.

3. तीनही पुरवठाधारकांनी दरपत्रकात दर नमूद नसताना करण ट्रेडर्स यांची निविदा प्रती पक्षी रुपये 107/- दराने कशाच्या आधारे मंजूर केली याबाबत विचारणा केली असता, खुलासा प्राप्त झाला नाही.

4. पंचायत समितीने दरपत्रके मागवताना कुकुट पक्षाचे वजन सरासरी 700 ते 800 ग्रॅम व वय सरासरी 8 ते 10 आठवडे असणेबाबत नमुद केले आहे. परंतु करण ट्रेडींगने दरपत्रक सादर करताना पक्षाचे सरासरी वजन 500 ग्रॅम व वयाबाबत कोणताही तपशील नमुद केलेला नसताना दरपत्रक मंजुर केले आहे.

5. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4

दिनांक 01.12.2016 मधील बाब क्रमांक 4.7 नुसार पुरवठा धारकाने पुरवठा केलेल्या तलंग गट योग्य दर्जाचे असल्याबाबत तपासणी करुनच पुरवठाधारकास प्रदान करणे आवश्यक असताना तलंग गटाची तपासणी केल्याबाबत कोणताही दस्तऐवज नस्ती उपलब्ध नसताना पुरवठाधारकास देयकाची पुर्ण रक्कम प्रदान केली आहे.

6. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2010/प्र.क्र.312/ पदुम-4 दिनांक 16.09.2010 नुसार लाभार्थ्यांची मास्टर नोंदवहीत नोंद घेतली नाही तसेच योजनेचा फलश्रुती अहवाल नस्तीसोबत नाही.

4.507 अनुसूचित जाती अनुसूचित जमाती अंतर्गत 75 टक्के अनुदानावर शेळी गट वाटपातील अनियमितता. पंचायत समिती कामठी, जिल्हा नागपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 5)

पंचायत समिती कामठी यांनी सन 2021-22 मध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अंतर्गत 75 टक्के अनुदानावर 39 लाभार्थ्यांना एकुण 5 प्रमाणकाव्दारे रक्कम रुपये 13,84,382/- शेळी गट वाटपावर खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो 2011/ प्र.क्र.305/पुदम-4, दिनांक 22 नोव्हेंबर 2011 नुसार शक्यतो राज्याबाहेरील नामांकीत बाजारातुन जनावरांची खरेदी करणे आवश्यक असताना कृषी उत्पन्न बाजार समिती, पवनी येथुन खरेदी केल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे.

2. उपरोक्त शासन निर्णय दिनांक 22 नोव्हेंबर 2011 मधील मार्गदर्शन सुचना क्रमांक 15 नुसार खरेदी केलेल्या जनावरांची महाराष्ट्र ॲनिमल आयडेंटीफीकेशन ॲन्ड रेकॉर्डींग ऑथोरिटी यांचेकडे नोंदणी करणेबाबत निर्देश असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

3. सर्व लाभार्थ्यांचा शेळी गटाचा विमा तात्काळ काढणे आवश्यक असतांना 1 ते 2 महिने उशिराने काढला आहे. तसेच शेळी गटाची खरेदी बाजार समिती, पवनी व नागपूर येथुन केल्यामुळे वाहतुक काळातील विमा Transit Insurance काढण्यात आला नाही.

4. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दिनांक 04.07.2013 च्या मार्गदर्शक सुचनानुसार लाभार्थ्यांची निवड करताना 30 टक्के महिला व 5 टक्के दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला नाही.

4.508 ओटीएसपी व विशेष घटक योजना 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप करणे बाबत. पंचायत समिती उमरेड, जिल्हा नागपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 8)

पंचायत समिती उमरेड यांनी सन 2021-22 मध्ये विशेष घटक योजनेतून 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप योजनेवर रुपये 17,60,640/- खर्च केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 नुसार जनावरांची खरेदी शक्यतो राज्याबाहेरील नामांकित बाजारातुन खरेदी करणे आवश्यक असताना कृषी उत्पन्न बाजार समिती पवनी येथुन खरेदी केल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे.

2. सर्व लाभार्थ्यांचा गाय गटाचा विमा तात्काळ काढणे आवश्यक असताना 2 ते 3 महिने उशिराने विमा काढल्याचे दिसुन आले. तसेच गाय गटाची खरेदी बाजार समिती पवनी येथुन केल्यामुळे वाहतुक काळातील विमा Transit Insurance काढण्यात आला नाही.

3. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दिनांक 04.07.2013 च्या मार्गदर्शक सुचना नुसार लाभार्थ्यांची निवड करताना 30 टक्के महिला व 5 टक्के दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला नाही.

4.509 विशेष घटक योजनाअंतर्गत अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थांना 75 टक्के अनुदानावर 10 + 1 शेळी गट वाटपाबाबत

पंचायत समिती अर्जुनी मोरगाव, जिल्हा गोंदिया, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 6)

पंचायत समिती अर्जुनी मोरगांव यांनी सन 2021-22 मध्ये विशेष घटक योजनेवर अनुसूचित जाती / जमातीच्या लाभार्थ्यांना 75 टक्के अनुदानावर 10 + 1 शेळी गट वाटपाचे अनुषंगाने रक्कम रुपये 28,70,880/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदुम-4 दिनांक 11 नोव्हेंबर 2011 नुसार शेळी/बोकडांची खरेदी प्राधान्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे येथून करणे आवश्यक आहे. मंडळाकडे उपलब्ध नसल्यास अधिकृत बाजारातून खरेदी करता येते. मात्र मंडळाकडे मेंढी व शेळी उपलब्ध नसल्याचा अहवाल उपलब्ध नसताना आमगाव येथील स्थानिक बाजारातून खरेदी केली आहे.

2. उपरोक्त नमूद शासन निर्णय दिनांक 11 नोव्हेंबर 2011 अन्वये शासकीय अनुदाना व्यतिरिक्त उर्वरित 25 टक्के हिश्याची रक्कम लाभार्थांनी स्वत: बँकेकडून कर्ज घेवुन (किमान 5 टक्के लाभार्थी हिस्सा व उर्वरित 20 टक्के बँकेचे कर्ज) उभारावयाचे असुन बँक/वित्तीय संस्थेकडून कर्ज घेणाऱ्या लाभार्थांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. तथापि लाभार्थी हिस्सा वसुल न करता शासकीय 75 टक्के अनुदान DBT द्वारे प्रदान केल्यामुळे योजनेचे स्वरुप (आर्थिक निकष) ची पुर्तता झाल्याचे दिसून येत नाही.

3. उपरोक्त नमूद शासन निर्णय दिनांक 11 नोव्हेंबर 2011 अन्वये अधिकारी /कर्मचाऱ्यामार्फत दर तिमाहीस वाटप केलेल्या शेळी गटांची लाभार्थी पशुपालकांच्या घरी जाऊन 100 टक्के पडताळणी करण्यात येऊन त्याचा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्या मार्फत वरिष्ठास सादर करणे आवश्यक असताना पडताळणी केल्याबाबतचा अहवाल नस्तीसोबत जोडला नाही.

4. बाजारातुन शेळी गट खरेदी करताना बिला सोबत जोडलेल्या छायांकीत फोटोत लाभार्थी व शेळी गट यांचेच फोटो असुन बाजारातुन शेळी गटाची खरेदी करताना पशुसंवर्धन अधिकारी/विस्तार अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी संलग्न असलेले फोटो जोडले नसल्याने शेळी गटाची बाजारातुन खरेदी केल्याची खात्री होत नाही.

4.510 आदिवासी क्षेत्र उपयोजना अंतर्गत अनुसूचित जमातीच्या व विशेष घटक योजने अंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थांना 75 टक्के अनुदानावर 10 + 1 शेळी गट वाटपाबाबत.

पंचायत समिती गोंदिया, जिल्हा गोंदिया सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 3)

पंचायत समिती गोंदिया यांनी सन 2021-22 मध्ये आदिवासी क्षेत्र उपयोजना अंतर्गत अनुसूचित जमातीच्या व विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना 75 टक्के अनुदानावर 10 + 1 शेळी गट वाटपावर रक्कम रुपये 44,08,320/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.323/पदुम-4 दिनांक 11 नोव्हेंबर 2011 नुसार लाभार्थ्यांनी उस्मानाबादी/संगमनेरी जातीच्या शेळी-बोकडांची खरेदी प्राधान्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे येथून करणे आवश्यक आहे. मंडळाकडे मेंढी व शेळी उपलब्ध नसल्यास अधिकृत बाजारातून खरेदी करता येते. मात्र मंडळाकडे मेंढी व शेळी उपलब्धते बाबतचा अहवाल नसताना स्थानिक बाजारातून शेळी गटाची खरेदी केली आहे.

2. उपरोक्त नमूद शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदुम-4 दिनांक 11 नोव्हेंबर 2011 नुसार शासकीय अनुदाना व्यतिरिक्त उर्वरित 25 टक्के हिश्याची रक्कम लाभार्थांनी स्वत:/ बँकेकडून कर्ज घेवुन (किमान 5 टक्के लाभार्थी हिस्सा व उर्वरित 20 टक्के बँकेचे कर्ज) उभारावयाचे आहे. बँक/वित्तीय संस्थेकडून कर्ज घेणाऱ्या लाभार्थांना प्राधान्य देण्यात यावे. याप्रमाणे लाभार्थी हिस्सा वसुल न करता शासकीय 75 टक्के अनुदान DBT द्वारे प्रदान केल्यामुळे योजनेचे स्वरूप (आर्थिक निकष) ची पुर्तता झाली नाही.

3. उपरोक्त शासन निर्णयान्वये अधिकारी /कर्मचाऱ्यामार्फत दर तिमाहीस वाटप केलेल्या शेळी गटांची लाभार्थी पशुपालकांच्या घरी जाऊन 100 टक्के पडताळणी करण्यात यावी व त्याचा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्या मार्फत वरिष्ठास सादर करण्यात यावा. असे असताना पडताळणी केल्याबातचा अहवाल नस्तीसोबत दिसून आला नाही.

4. उपरोक्त शासन निर्णयान्वये योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना क्रमांक 4 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थांना या योजनेंतर्गत लाभ देणे आवश्यक असताना लाभ देण्यात आला नाही.

5. उपरोक्त शासन निर्णयान्वये योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना क्रमांक 3 नुसार 30 टक्के महीला लाभार्थ्यांना प्राधान्याने लाभ देणे आवश्यक असताना एकुण निवड केलेल्या 53 लाभार्थी पैकी 13 महीला लाभार्थींचीच निवड केली आहे. म्हणजे 3 महीला लाभार्थींची कमी निवड केली आहे. त्यामुळे 3 महीला लाभार्थी लाभापासून वंचीत राहिल्या आहेत.

6. आदिवासी क्षेत्र उपयोजना/आदिवासी क्षेत्राबाहेरील योजना अंतर्गत शेळी गटांचा पुरवठा करणे जिल्हा स्तरीय निवड समिती सभा दिनांक 18/01/2021 अन्वये 56 लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत निवड केली असताना त्यापैकी 53 लाभार्थ्यांना व विशेष घटक योजनाअंतर्गत अनुसूचित जातीचे 77 लाभार्थी पैकी 70 लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे. म्हणजेच आदिवासी क्षेत्र उपयोजनेचे 3 लाभार्थी व विशेष घटक योजनेचे 7 लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहीले आहेत.

7. पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी त्यांच्या तालुक्यात वाटप केलेल्या एकुण शेळी गटाच्या 25 टक्के, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हयात फिरतीच्या वेळी वाटप केलेल्या एकुण शेळी गटाची 10 टक्के अचानकपणे प्रत्यक्ष पडताळणी करुन तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

8. योजना संपल्यानंतर प्रादेशीक सहआयुक्त पशुसंवर्धन यांचे अध्यक्षतेखालील समितीने योजनेचे मुल्यमापन करणे आवश्यक आहे. परंतु तसा मुल्यमापन केल्याचा अहवाल नस्तीसोबत नाही.

9. आदिवासी उपयोजनेंतर्गत लाभार्थ्यांची यादी, खर्च व मूल्यांकन अहवाल आदिवासी आयुक्त, नाशिक तसेच संबंधित अधिकाऱ्यांना पाठविणे आवश्यक असताना ती कार्यवाही केली नाही. तसेच मार्गदर्शक सूचनांनुसार लाभार्थ्यांच्या शेळी गटापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची नोंद पशुवैद्यकीय संस्थेकडे ठेवणे अपेक्षित असताना त्याबाबतची नोंदवही उपलब्ध नाही. याशिवाय लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही, उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल उपलब्ध नसल्याने योजनेचा उद्देश सफल झाल्याचे दिसून येत नाही.

4.511 आदिवासी क्षेत्र उपयोजना अंतर्गत अनुसूचित जमातीच्या व विशेष घटक योजना अंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थांना 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे गट वाटप करणेतील अनियमिततेबाबत. पंचायत समिति गोंदिया, जिल्हा गोंदिया सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 4)

पंचायत समिती गोंदिया यांनी सन 2021-22 मध्ये आदिवासी क्षेत्र उपयोजना अंतर्गत अनुसूचित जमातीच्या व विशेष घटक योजने अंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे गट वाटपावर रक्कम रुपये 50,30,400/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो/ 2011/प्र.क्र./35/पदुम-8 दिनांक 22.11.2011 मधील सूचना क्रमांक 13 नुसार दुभत्या जनावरांची खरेदी शक्यतो राज्याबाहेरील नामांकित पशूच्या बाजारातून करावी असे असताना तशी कार्यवाही केली नाही.

2. उपरोक्त शासन निर्णयामधील मार्गदर्शन सूचना क्रमांक 15 नुसार खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची महाराष्ट्र ॲनिमल आयडेंटिफिकेशन ॲन्ड रेकॉर्डिंग ऑथॉरिटी यांचेकडे नोंदणी करणे बंधनकारक असताना त्यानुसार नोंदणी केल्याबाबतचा पुरावा जोडला नाही.

3. उक्त शासन निर्णयातील मार्गदर्शत सुचना क्रमांक 8 नुसार लाभार्थीची निवड झाल्यानंतर एक महिन्याच्या आत लाभार्थी हिश्श्याची रक्कम किंवा बँकेचे कर्ज उभारणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 50(4) नुसार लाभार्थी हिस्सा स्विकारल्याबाबत नमुना-10 मधील पावती देणे आवश्यक असताना एकाही लाभार्थीस पावती देण्यात आली नाही. त्यामुळे लाभार्थी हिस्सा वसुल केला याबाबत खात्री होत नाही.

4. पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचना पत्र क्रमांक एफवायपी-11(9) सीआर-585/2012, पंस-6 दिनांक 6 मार्च 2012 नुसार आर्थिक वर्षाच्या सुरवातीपासुन वार्षिक वेळापत्रक आधारभुत माणून योजनेची अंमलबजावणी करावी तसेच सदर योजना सुरु केल्यापासुन दिलेले सर्व कार्यक्रम नियोजनबध्द पध्दतीने राबवुन 6 महिन्यांच्या टप्प्याने एकुण 1 वर्षाच्या कालावधीनंतर योजना पुर्ण झाल्यानंतर सर्व दुधाळ जनावरांचे दुध उत्पादनाबाबत व इतर बाबत सर्वेक्षण करुन त्याच्या नोंदी प्रपत्र ब मध्ये नोंदविणे आवश्यक आहे. त्यानुसार सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेले प्रपत्र अ व ब विवरणपत्र नस्तीसोबत दिसून आले नाही.

5. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदुम-4 दिनांक 22 नोव्हेंबर 2011 मधील मार्गदर्शन सूचना क्रमांक 18 नुसार अधिकारी/ कर्मचाऱ्यामार्फत दर तिमाहीस वाटप केलेल्या दुधाळ जनावरांची पशुपालकांच्या घरी जाऊन 100 टक्के

पडताळणी करणे व त्याचा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्या मार्फत वरिष्ठास सादर करणे आवश्यक असताना तशी पडताळणी केली नाही.

6. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदुम-4 दिनांक 22 नोव्हेंबर 2011 नुसार योजनेचा मूल्यांकन अहवाल शासनास सादर केला नाही. तसेच 3 टक्के दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ दिल्याबाबतचे दस्तऐवज उपलब्ध नाहीत.

7. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-1002/प्र.क्र.128/अर्थोपाय दिनांक 06 जुन 2008 नुसार अखर्चित अनुदान शासनास परत करणे आवश्यक असताना त्याबाबतचे चलन उपलब्ध नाही. तसेच मास्टर नोंदवही सादर न केल्याने एकाच कुटुंबाला दुबार लाभ दिल्याची पडताळणी करता आली नाही.

4.512 पशुसंवर्धन विभागाचे विविध योजनांमधील अनियमिततांबाबत.

पंचायत समिती चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 17)

पंचायत समिती चंद्रपूरचे सन 2021-22 या वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये पशुसंवर्धन विभागाचे विविध योजनांचे अभिलेखे तपासले असता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. नैसर्गिक आपत्ती जसे की सर्पदंश, भूकंप, आग, पूर, वीज व वादळ यांमुळे मृत पावलेल्या जनावरांच्या मालकांना अर्थसहाय्य योजनेंतर्गत प्रति जनावर जास्तीत जास्त रुपये 10,000/- पर्यंत अनुदान देण्याची तरतूद आहे. या योजनेअंतर्गत 4 प्रमाणकांनुसार एकूण रुपये 4,80,000/- इतका खर्च केला आहे. मात्र अर्जांची तपासणी केली असता -

अ) अधिकृत पंचनाम्याच्या प्रती व लाभार्थ्यांची ओळखपत्रे नस्तीसोबत संलग्न नसल्याने पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला का याची खात्री करता आली नाही.

ब) लाभार्थ्यांच्या अर्जांची कार्यालयाच्या आवक नोंदवहीत नोंद केलेली नाही. लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यात न आल्यामुळे एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ मिळण्याची शक्यता निर्माण होते. याशिवाय लाभार्थ्यांचे अर्ज ग्रामपंचायतीच्या शिफारशीसह प्राप्त होणे अपेक्षित असताना तसे झाले नाही.

2. लेखाशिर्ष 2403-सी 205 अंतर्गत एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रमासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून 5 प्रमाणकांन्वये रुपये 5,32,000/- इतका खर्च नोंदविला आहे. तथापि, लेखापरीक्षणात खाली नमूद केलेल्या अनियमितता आढळून आल्या - अ) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2010/प्र.क्र.312/पदुम-4 दिनांक 16/09/2010 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार 50 टक्के अनुदानावर 100 एकदिवसीय कुक्कुट पिलांचा गट वाटप करण्यात येतो; परंतु त्यानुसार अर्ज नोंदवही व लाभार्थी नोंदवही ठेवण्यात आली नाही.

ब) योजनेचा व्यापक प्रचार व प्रसिद्धी केलेली नाही. विहित कालावधीत खरेदी न करता लाभार्थ्यांची निवड करून लाभ देण्यात आला आहे आणि मौका पडताळणी अहवालावर दिनांक नमूद नाही. खरेदीची नोंद साठा पुस्तकात न घेता साहित्य वाटप केले असून, एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त लाभार्थ्यांना लाभ दिला आहे.

क) 50 टक्के लाभार्थी हिस्सा जमा केल्याचे दस्तऐवज, पिलांचे लसीकरण केल्याचे पुरावे तसेच पशुखाद्य पोषणयुक्त असल्याबाबत प्रयोगशाळेचा विश्लेषण अहवाल उपलब्ध नाही.

3. 75 टक्के अनुदानावर अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना दुधाळ जनावरांचा गट पुरविणे या योजनेअंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेद्वारे 6 प्रमाणकांन्वये रुपये 11,90,854/- इतका खर्च नोंदविला आहे. तथापि, लेखापरीक्षणात खाली नमूद केलेल्या अनियमितता आढळून आल्या - अ) विहित मुदतीत लाभार्थी हिस्सा जमा झालेला नसतानाही लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. तसेच प्रस्तावातील लाभार्थ्यांच्या अर्जामध्ये त्रुटी असतानाही त्यांची पूर्तता न करता प्रस्ताव मंजूर करण्यात आले.

ब) महाराष्ट्र ॲनिमल आयडेंटिफिकेशन अँड रेकॉर्डिंग अथॉरिटी यांच्याकडे नोंदणी केलेली नाही तसेच स्वतंत्र नोंदवहीत आवश्यक नोंदी ठेवलेल्या नाहीत.

क) काही प्रकरणांमध्ये लाभार्थ्यांनी लाभ न घेतल्यामुळे अनुदानाची रक्कम अखर्चित राहून ती शासन खात्यात जमा केली नाही. याशिवाय लाभार्थ्यांचे अर्ज व अनुषंगिक कागदपत्रे उपलब्ध नसून सक्षम प्राधिकाऱ्यांकडून आवश्यक पडताळणीही केली नाही.

4. 75 टक्के अनुदानावर आर्थिक दृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना बकरी गट पुरविणे या योजनेअंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतून 2 प्रमाणकांद्वारे रुपये 1,96,685/- इतका खर्च नोंदविला आहे. तथापि, लेखापरीक्षणात पुढील अनियमितता आढळून आल्या - अ) लाभार्थ्यांचे मूळ अर्ज व संबंधित कागदपत्रे उपलब्ध नसून लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. तसेच अपात्र लाभार्थ्याला लाभ दिल्याचे आढळून आले आहे.
ब) लाभार्थी स्तरावर लसीकरण करण्यात आल्याबाबत कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नाहीत. याशिवाय साठा नोंदवहीतील नोंदी अद्ययावत नसून वाटप केलेल्या औषधाबाबत साठा नोंदवहीवर संबंधितांची स्वाक्षरी नाही.

3.513 75 टक्के अनुदानावर अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना (TSP) दोन दुधाळ जनावराचे गट वाटप करणेबाबत.

पंचायत समिती चिमुर, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 3)

पंचायत समिती चिमुर यांनी सन 2021-22 मध्ये 75 टक्के अनुदानावर अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना (TSP) दोन दुधाळ जनावरांचे गट वाटप करणे करीता 2 लाभार्थ्यांना रक्कम रुपये 1,27,592/- अनुदान वितरीत केले आहे. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक राज्ययो-2012/ प्र.क्र.159/पदुम-4 दिनांक 30 ऑक्टोबर 2015 मधील मुद्दा क्रमांक 21 नुसार पंचायत समितीने जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीत, निवड न झालेल्या लाभार्थ्यांना लाभ दिल्यामुळे रुपये 63,796/- अंतिम अमान्य केली आहे.

2. उपरोक्त शासन निणर्यामधील मुद्दा क्रमांक 3 नुसार लाभार्थी निवड करताना 30 टक्के महिला लाभार्थ्यांची निवड केली नाही. तसेच मुद्दा क्रमांक 7 नुसार निवड झाल्यानंतर लाभार्थ्यांनी एक महिन्यात लाभार्थी हिस्सा रक्कम जमा न केल्यास प्रतिक्षा सूचीतील पुढील लाभार्थीस लाभ देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

3. उपरोक्त शासन निणर्यामधील मुद्दा क्रमांक 9 अन्वये ही योजना क्लस्टर स्वरुपात आणि अस्तित्वातील/ प्रस्तावित दूध संकलन मार्गावरील गावांमध्ये राबविणे आवश्यक असताना त्यानुसार लाभार्थ्यांची निवड केली नाही आणि मुद्दा क्रमांक 10 नुसार प्रति दिन 10 ते 12 लिटर दुध देणाऱ्या एच.एफ./जर्सी या संकरित गायी तसेच मुऱ्हा व जाफराबादी या सुधारित जातीच्या म्हशी खरेदी केल्या नाहीत.

4. उपरोक्त शासन निणर्यामधील मुद्दा क्रमांक 11 नुसार खरेदी समिती गठित न करताच जनावरांची खरेदी केली आहे.

5. उपरोक्त शासन निणर्यामधील मुद्दा क्रमांक 12 नुसार गायी / म्हशींची खरेदी राज्याबाहेरुन केली नाही. तसेच मुद्दा क्रमांक 13 नुसार जनावरांचा लाभार्थी व संबंधित जिल्हातील जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने 3 वर्षासाठी विमा काढण्यात आला नाही.

6. उपरोक्त शासन निणर्या मधील मुद्दा क्रमांक 15 नुसार प्रथमत: एक दूधाळ जनावर व सहा महिन्यानंतर उर्वरीत एक दूधाळ जनावर पुरविण्यात यावे परंतू 2 दुधाळ जनावरे एकत्रितच खरेदी केली आहेत. तसेच मुद्दा क्रमांक 18 अन्वये पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या जनावरांच्या 25 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करावी परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

7. उपरोक्त शासन निणर्या मधील मुद्दा क्रमांक 23 नुसार लाभार्थ्यांकडे जनावरांचे पालन करण्यासाठी पूरेशी जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे परंतु तसा तपासणी अहवाल उपलब्ध नाही. तसेच मुद्दा क्रमांक 24 अन्वये लाभार्थ्यांने दुग्ध व्यवसाय, गो/म्हैस पालन विषयक प्रशिक्षण घेणे आवश्यक असताना तसे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र सादर केले नाही.

8. एकूण 8 लाभार्थ्यांसाठी एकूण प्राप्त निधी रुपये 5,10,368/- पैकी रुपये 1,27,592/- इतका खर्च झाला असून शिल्लक रक्कम रुपये 3,82,776/- जिल्हा परिषदेला परत केली नाही.

9. लाभार्थ्यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती पवनी, जिल्हा भंडारा येथून जनावर खरेदी केली आहे, परंतु पावतीवर बाजार समितीचे जावक क्रमांक, दिनांक तसेच सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेली नाही.

10. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 मधील नियम क्रमांक 93 अन्वये पशुधनाची नोंदवही नमुना 35 ठेवणे आवश्यक असताना सदर नोंदवही ठेवली नाही. तसेच फलश्रुती

अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीमध्ये उपलब्ध नाही.

11. लाभार्थ्यांनी करारनामा रुपये 500/- च्या मुद्रांकावर न करता रुपये 200/- वर केल्यामूळे दोन लाभार्थ्यांचे एकूण रुपये 600/- कमी भरणा केली आहे.

4.514 पशुसंवर्धन विभागातील विविध योजनांमध्ये निदर्शनास आलेल्या अनियमितता बाबत.

पंचायत समिती मुल, जिल्हा चंद्रपुर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 11)

पंचायत समिती मुल यांनी सन 2021-22 या वित्तीय वर्षात एकुण 8 योजना राबविल्या असून त्या अंतर्गत रक्कम रुपये 19,50,028/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-1020/प्र.क्र.110/ पदुम-3 दिनांक 25.05.2021 मुद्दा क्रमांक 6(1) अन्वये शेळ्यांची खरेदी केल्यानंतर लाभार्थ्याने त्यांचा विमा लगेच उतरवणे बंधनकारक असताना विमा काढल्याचे दस्तऐवज नस्तीला नाहीत. तसेच शेळ्यांना बिल्ला क्रमांक लावल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे युनायटेड इन्सुरन्स कंपनी लिमीटेडच्या नियमानुसार नो बिल्ला नो क्लेम नुसार शेळ्या/बोकड यांचा मृत्यु झाल्यास क्लेम करता येणार नाही.

2. कुक्कुट पिल्ले गट वाटप योजनेच्या मार्गदर्शक सुचना अन्वये एका कुटबांतील एकापेक्षा जास्त लाभार्थांची निवड झाली असल्यास कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. परंतु पती पत्नी अशा दोघांना लाभ देण्यात आल्याने रक्कम रुपये 8,000/- संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

3. एकाच बीजकामार्फत दोन लाभार्थ्यांनी खरेदी दर्शविली असून त्यांनी धनलक्ष्मी पशुखाद्य भांडार बोरचांदली, मुल इथून एकाच बिल क्रमांक 901/दिनांक 13.02.2022 रोजी रुपये 6,000/- व दिनांक14.02.2022 रोजी रुपये 6,000/- चे पशुखाद्य खरेदी केल्याने एकाच उपप्रमाणकांवर दोघांनी लाभ घेतल्याचे दिसून येते.

4. कुक्कुट पिल्ले वाटप करताना पिल्लांना विशेषत: मॅरेक्स, राणीखेत आणी देवी रोगांवरील लसीकरण लसीकरण झाल्याचे कोणतेही दस्ताऐवज नस्तीबध्द नाही.

5. पशुखाद्य पुरवठा योजनेच्या मार्गदर्शक सुचना अन्वये एका कुटबांतील एकापेक्षा जास्त लाभार्थांची निवड झाली असल्यास कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. परंतु पती पत्नी अशा दोघांना लाभ देण्यात आल्याने नंतर देण्यात आलेले रक्कम रुपये 4,950/- संबंधितांकडून वसूल करावे.

6. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक राज्ययो-2012/ प्र.क्र.159/पदुम-4 दिनांक 30 ऑक्टोबर 2015 मधील तरतुदींचे पालन झाले नाही. योजनेची अंमलबजावणी क्लस्टर पद्धतीने व दूध संकलन मार्गावरील गावांमध्ये केली नाही. लाभार्थी निवडीत 30 टक्के महिलांना प्राधान्य देण्यात आले नाही. एका जनावरानंतर 6 महिन्यांनी दुसरे जनावर देणे, पडताळणी व जागेचा तपासणी अहवाल आणि लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणे अशी कार्यवाही केली नाही.

7. पशुधनाची नोंदवही नमुना 35 ठेवली नाही. योजनेचे फलश्रुती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र नस्ती मध्ये उपलब्ध नाही तसेच लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम प्राप्त झालेबाबत पोहोच नस्तीमध्ये नाही.

8. लाभार्थ्यांनी करारनामा रुपये 500/- च्या मुद्रांक शुल्कावर करणे आवश्यक असताना रुपये 200/- वर केल्यामुळे संबंधित लाभार्थ्यांकडून एकूण रुपये 3,600/- मुद्रांक शुल्काची रक्कम कमी भरणा केली आहे.

4.515 शासकीय निधी पशुसंवर्धन विभागाअंतर्गत 50 टक्के, 75 टक्के व 100 टक्के अनुदानावर DBT व्दारे विविध योजनेच्या अनुदान वाटप करण्यातील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती पोंभुर्णा, जिल्हा चंद्रपूर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 5)

पंचायत समिती पोंभुर्णा यांनी सन 2021-22 मध्ये पशुसंवर्धन विभागांतर्गत 50 टक्के, 75 टक्के व 100 टक्के अनुदानावर DBT व्दारे कुक्कुट पिले गट वाटप, जनावरांना पशुखाद्य, दोन दुधाळ जनावरे वाटप आणि शेळी गट वाटप अशा विविध योजनेच्या अनुदान वाटपावर रुपये 7,55,956/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. 50 टक्के अनुदानावर लाभार्थ्यांना एक दिवसीय 100 कुक्कुट पिले गट अनुदान वाटप योजनेतून एकुण 24 लाभार्थ्यांपैकी 17 लाभार्थ्यांनाच निधी वाटप केला आहे. त्यामुळे 7 लाभार्थी योजनेपासून वंचित राहिले असून

त्याची अखर्चित रक्कम रुपये 56,000/- शासनाला परत केली नाही.

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2010/प्र.क्र.312/पदुम-4 दिनांक 16/09/2010 मधील मार्गदर्शक तत्वांनुसार 30 टक्के महिलांना प्राधान्य देणे अपेक्षित असताना तसे आढळून आले नाही. उत्पन्न व अंडी उत्पादनाबाबतचा फलश्रुती अहवाल मोघम असून जिल्हास्तरीय समितीने निवडलेली लाभार्थी यादी लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. तसेच शासन निर्णयातील अट क्रमांक 1 चे उल्लंघन करून एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त सदस्यांना लाभ देण्यात आला आहे.

2. विशेष घटक योजनांतर्गत दुभत्या जनावरांना भाकड कालावधीसाठी 100 टक्के अनुदानावर पुशखाद्य अनुदान वाटप योजनेतील 16 लाभार्थ्यांपैकी 13 लाभार्थी हे एकाच गावचे निवडल्यामुळे योजनेचा व्यापक प्रचार झाला नसल्याचे दिसून येते. एकाच कुटूंबातील लाभार्थ्यांना लाभ दिल्यामुळे अन्य लोक या योजनेपासुन वंचीत राहील्याचे दिसून आले.

3. आदिवासी उपयोजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना दोन दुधाळ जनावराचा गट 75टक्के अनुदान वाटप योजनेमध्ये प्रती लाभार्थी रुपये 63,796/- प्रमाणे 7 लाभार्थ्यासाठी एकूण रुपये 4,46,572/- इतकी तरतूद असून त्यापैकी 6 लाभार्थ्यांना लाभ दिल्याने रुपये 63,796/- अखर्चित राहिले आहेत.

पशुधन विकास अधिकारी कार्यालयाकडे प्राप्त अर्जांची तारीखनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवली नाही. पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य याचे पत्र क्रमांक पुशधन-1/नायो/दुगवा/9800-75/2018/पंस-13, पुणे-7 दिनांक 31/10/2018 मधील मुद्दा क्रमांक 21 जनावरांच्या खरेदीनंतर ट्रांझिट विमा काढल्याचे अभिलेख उपलब्ध नाहीत. लाभार्थी निवडीत सुशिक्षित बेरोजगार, महिला बचत गट, 30 टक्के महिला व 5 टक्के अपंग यांना प्राधान्य दिल्याचे दिसून येत नाही.

अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांचे जात प्रमाणपत्र, पशुधनाचा तीन वर्षांचा विमा, तिमाही आरोग्य पडताळणी, अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष तपासणी, तीन वर्षे दुग्ध व्यवसाय केल्याचे अभिलेख व दुध संकलन क्लस्टरबाबतची माहिती लेखापरीक्षणास सादर केलेली नाही.

4. आदिवासी उपयोजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना शेळी गट (10+1) 75 टक्के अनुदान वाटप योजनेमध्ये प्रती लाभार्थी रुपये 35,886/- प्रमाणे 7 लाभार्थ्यासाठी एकूण रुपये 2,51,202/- तरतूदीपैकी 5 लाभार्थ्यांना लाभ दिल्याने रुपये 71,772/- अखर्चित राहिले आहेत.

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदुम-4 दिनांक 11/11/2011 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेची प्रसिध्दी करणे, विकलांग लाभार्थ्यांना प्राधान्य देणे, शेळीगट संगोपनासाठी पुरेशी जागा असल्याचे ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र, प्रशिक्षण प्रमाणपत्र व अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष पडताळणी अहवाल सादर करणे अपेक्षित होते; मात्र याबाबत कार्यवाही केली नाही. तसेच ही योजना अनुसूचित जमातीसाठी असूनही लाभार्थ्यांचे जात प्रमाणपत्र नोंदवहीत उपलब्ध नाही.

4.516 आदिवासी उपयोजना अंतर्गत अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांना शेळीगट वाटप करणेतील अनियमिततेबाबत

पंचायत समिती कुरखेडा, जिल्हा गडचिरोली, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 7)

पंचायत समिती कुरखेडा यांनी सन 2021-22 मध्ये आदिवासी उपयोजनेंतर्गत अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांना शेळीगट वाटप करणे योजनेवर एकुण रुपये 1,79,425/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 4 व ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2016/प्र.क्र.56/वित्त-9 दिनांक 7 ऑक्टोबर, 2017 नुसार सदर योजनेस तांत्रिक मान्यता घेतलेली नाही.

2. योजनेकरीता जिल्हा निवड समिती/विषय समिती, जिल्हा परिषद गडचिरोली यांनी लाभार्थी निवड केल्याचे दिसुन आले नाही.

3. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदुम-4 दिनांक 11 नोव्हेंबर 2011 मधील मार्गदर्शक सुचनानुसार पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी लाभार्थ्यांची नोंद शेळी गटाच्या तपशिलासह नोंदवहीमध्ये ठेवलेली नाही.

4. उपरोक्त शासन निर्णय दिनांक 11 नोंव्हेंबर, 2011 मधील मार्गदर्शक सुचनानुसार पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या एकुण शेळी गटाच्या 25 टक्के गटांची पडताळणी केल्याचे दिसले नाही.

5. उपरोक्त शासन निर्णयामधील मार्गदर्शक सुचनानुसार प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची तारीख निहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवली नाही. तसेच सदर योजनेस प्रसिध्दी माध्यमांव्दारे व्यापक प्रसिध्दी दिल्याबाबत दस्ताऐवज नस्तीबध्द नाही.

6. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक पशुधन-3/जि.शे.ग.वा.यो./2515-90/2015, पसं-13 दिनांक 24.06.2015 मधील सुचनानुसार लाभार्थ्यांना शेळी गट पालनाचे/ संगोपनाचे एक दिवसीय प्रशिक्षण दिले नाही.

7. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 50(4) नुसार वसुल केलेल्या लाभार्थी हिस्सा रकमेबाबत कार्यवाही केली नाही.

8. फलश्रुती अहवाल नस्तीला आढळून नाही. त्यामुळे लाभार्थ्याला शेळी गटाचा लाभ मिळाल्यानंतर त्यापासून किती आर्थिक लाभ झाला याबाबतची तपासणी करता आली नाही.

9. ज्या विक्रेत्याकडुन शेळी गट विकत घेण्यात आले त्या विक्रेत्याचे जनावरांसोबत GPS TAGGED छायाचित्र नस्तीला दिसुन आले नाही.

4.517 विशेष घटक योजना अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द लाभार्थ्यांना दुधाळ गाई/म्हशी गट वाटप करणेतील अनियमिततेबाबत

पंचायत समिती चामोर्शी, जिल्हा गडचिरोली, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 9)

पंचायत समिती चामोर्शी यांनी सन 2021-22 मध्ये विशेष घटक योजना अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द लाभार्थ्यांना दुधाळ गाई/म्हशी गट वाटप करणे योजनेवर एकुण रक्कम रुपये 4,46,573/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो- 2011/ प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील निर्देशानुसार वाटप केलेल्या दुधाळ जनावरांचा 3 वर्षासाठी विमा लाभार्थी व संबंधित जिल्हयातील जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्या नावे न काढता गट विकास अधिकारी व लाभार्थी यांचे नावे असल्याचे दिसुन आले.

2. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 4 व ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2016/प्र.क्र.56/वित्त-9 दिनांक 7 ऑक्टोबर, 2017 नुसार सदर योजनेस प्रशासकीय मान्यता घेतली नाही.

3. उपरोक्त शासन निर्णय दिनांक 22/11/2011 मधील निर्देशानुसार दुधाळ जनावरे खरेदी समितीमध्ये कार्यक्षेत्रातील पशुवैदयकीय दवाखान्याचे संस्था प्रमुख, गावातील प्राथमिक सहकारी दुध संस्थेचे प्रतिनिधी व बँक प्रतिनिधीचा समावेश नाही.

4. ज्या विक्रेत्याकडुन दुधाळ जनावर विकत घेण्यात आले त्या विक्रेत्याचे जनावरांसोबत GPS TAGGED छायाचित्र नस्तीला दिसुन आले नाही. तसेच लाभार्थ्यांचे जनावरांसह असलेले छायाचित्र हे खरेदी केलेल्या ठिकाणाचे नसून जनावरांचे गोठ्यातील असल्याचे दिसुन येते.

5. उपरोक्त शासन निर्णय दिनांक 22/11/2011 नुसार पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांपैकी 25 टक्के जनावरांची व जिल्हा पशुसवर्धन अधिकारी यांनी 10 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी केल्याचे अहवाल उपलब्ध नाही. तसेच लाभार्थ्यांना दुग्ध व्यवसाय/गाय-म्हैस पालन विषयक प्रशिक्षण दिले नाही.

6. उपरोक्त शासन निर्णय दिनांक 22/11/2011 नुसार योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची Maharashtra animal specification and recording authorityकडे नोंदणी केल्याचे दिसले नाही.

7. शासन निर्णय दिनांक 22/11/2011 नुसार सदर दुधाळ जनावरांना आरोग्य विषयक आणि पैदाशीच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात व जनावरांतून मिळालेले वेतातील दुध उत्पादन, माज दाखविण्याच्या दिनांक, नर /मादी वासरु, जन्मताच वासराचे वजन इत्यादींचे नोंद स्वतंत्र नोंदवही मध्ये घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे नोंदवही ठेवली आहे परंतु त्यातील नोंदी अद्यावत नाहीत.

8. शासन निर्णय दिनांक 22/11/2011 अन्वये लाभार्थीची निवड झाल्यापासुन 1 महिन्यात लाभार्थी हिस्सा रक्कम जमा न केल्यास प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांस लाभ देण्याचे निर्देश असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करता काही लाभार्थींनी 2 महीने उशीराने लाभार्थी हिस्सा भरल्याचे दिसून आले.

9. अपंग लाभार्थींना 3 टक्के प्रमाणे लाभ दिल्याचे दिसुन आले नाही.

10. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 93 नुसार पशुधन रजीस्टर नमुना क्रमांक 35 मध्ये ठेवण्यात आले नाही.

11. लाभार्थी यांनी खरेदी केलेल्या गाय गटाची खरेदी पावतीवरील तपशील व छायाचित्रातील जनावरांचा तपशील जुळत नसल्याचे दिसून आले. तसेच सदर जनावरांचे विमाप्रत नस्तीत दिसून आली नाही.

12. लाभार्थ्याला दुधाळ जनावरा पासून झालेल्या आर्थिक लाभ, दुध उत्पादनाबाबत फलश्रुती अहवाल प्राप्त केल्याचे दिसून आले नाही.

4.518 विशेष घटक योजने अंतर्गत 75 टक्के अनुदानावर शेळी गट खरेदी वाटप योजनेबाबत.

पंचायत समिती पैठण, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 8)

पंचायत समितीने सन 2021-22 मध्ये विशेष घटक योजना, आदिवासी क्षेत्र उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेअंतर्गत अनुसुचित जाती, नवबौध्द/अनुसुचित जमातीच्या लाभार्थींना ग्रामीण भागात स्वयंरोजगाराद्वारे उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संकरीत दुधाळ शेळी गट खरेदीसाठी 75 टक्के अनुदान व 25 टक्के लाभार्थी हिस्सा/वित्तीय संस्थेचे कर्ज या तत्वावर अनुदान वाटप करणे या योजनेवर रुपये 14,96,019/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सिआर67/34/2239 दिनांक 19/01/2001 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्यानंतर लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीतील सुधारणेबाबतचा अहवाल नस्तीसोबत आढळुन आला नाही.

2. जिल्हा परिषदचे पत्र क्रमांक जिपऔ/पशु/तांत्रिक/2017-18/581-1591 दिनांक 30/11/2017 मधील अट क्रमांक 3 अन्वये निवडलेल्या लाभार्थीला मागील पाच वर्षामध्ये सदर योजनेंतर्गत लाभ दिला नसल्याची पडताळणी करता आली नाही.

3. कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.323/पदुम-4 दिनांक 11/11/2011 च्या मार्गदर्शक सुचना क्रमांक 3 व 4 नुसार लाभार्थी निवडतांना 30 टक्के महिलांना व 3 टक्के विकलांग लाभार्थ्यांना लाभ दिला नाही.

सुचना क्रमांक 20 नुसार वाटप केलेल्या शेळ्यांची नोंद स्वतंत्र नोंदवहीमध्ये घेऊन अधिकारी/ कर्मचाऱ्यांमार्फत दर तीन महिन्यानी वाटप केलेल्या शेळी गटाचे लाभार्थी/पशुपालकाच्या घरी जावून 100 टक्के पडताळणी करुन पशुधन विकास अधिकारी(विस्तार) यांच्या मार्फत वरिष्ठ कार्यालयास अहवाल सादर केला नाही.

सुचना क्रमांक 21 पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी लाभ दिलेल्या गटाच्या 25 टक्के, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद यांनी 10 टक्के गटाची फिरतीच्या वेळी अचानकपणे प्रत्यक्ष पडताळणी करुन अहवाल वरीष्ठास सादर केला नाही.

4. शेळी व बोकड यांना नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातून आवश्यक रोग प्रतिबंधक लसीकरण, जंतुनाशके पाजले बाबत पशुवैद्यकीय अधिकारी यांचा अहवाल नाही.

5. शेळ्या व बोकड, शेळी विकास महामंडळ यांच्याकडून खरेदी करते वेळेस ते सर्व तंदुरुस्त व कोणताही आजार नसल्याबाबत पशुवैद्यकीय अधिकारी यांचा तपासणी अहवाल देयकासोबत नाही.

6. उपरोक्त नमूद शासन निर्णय दिनांक 11/11/2011 मधील परिच्छेद 4 नुसार दुधाळ जनावरांची आयडेन्टीफीकेशन अँड रेकॉर्डींग ॲथॉरिटी यांच्याकडे नोंदणी केली नाही.

4.519 पशुसंवर्धन अंतर्गत दुधाळ जनावरांचे गट वाटप योजनेतील अनियमिततेबाबत.

पंचायत समिती निलंगा, जिल्हा लातूर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 4)

पंचायत समिती निलंगाने सन 2021-22 मध्ये पशुसंवर्धन अंतर्गत दुधाळ जनावरांचे गट वाटपासाठी एकूण 20 लाभार्थ्यांसाठी प्रती लाभार्थी रक्कम रुपये 63,796/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 12,75,920/- इतका

खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमणे अभिप्राय आहेत.

1. लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला नसल्याबाबत तसेच जनावरे खरेदी केल्याने त्यांच्या जीवनमानात, उत्पन्नामध्ये किती वाढ झाली याबाबत अभिलेखे उपलब्ध केले नाही.

2. ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार लाभार्थी निवड प्रक्रिया राबविली नाही. जनावरे खरेदी करण्यापूर्वीच रक्कम खात्यात जमा केली आहे.

3. कृषि पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11.11.2011, नुसार रुपये 200/- ऐवजी रुपये 100/- च्या मुद्रांकवर करारनामा केल्याने, 16 लाभार्थ्यांसाठी रुपये 100/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 1,600/- वसूल करणे आवश्यक आहे.

4. ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक मागास/1089/प्र.क्र.55, दिनांक 05/10/1989, नुसार लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असताना, अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थ्यांना इतर विभागाकडून राबविण्यात आलेल्या योजनेतून यापूर्वी लाभ दिलेबाबत तपासणी करता आली नाही.

5. ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2016/प्र.क्र.9/वित्त-9, दिनांक 19/05/2016, नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनांचा खर्च विहित कालमर्यादेत व त्याच आर्थिक वर्षात करणे आवश्यक असताना सदर योजना वर्ष अखेरीस राबविल्याने लाभ पुढील आर्थिक वर्षात मिळाला. 4 लाभार्थीची एकूण रक्कम रुपये 2,55,184/- त्यांच्या खात्यावर जमा न करता पशुधन विकास अधिकारी (वि.) पंचायत समिती निलंगा यांच्या नावे अदा केली आहे. ज्यामुळे शासनाची अखर्चित रक्कम वार्षिक लेख्या बाहेर राहिली असून पंचायत समिती कडून चुकीचा वार्षिक लेखा सादर केला आहे. अखर्चित रक्कम रुपये 2,55,184/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.305/पदुम-4 दिनांक 22/11/2011 नुसार राज्याबाहेरील नामांकित पशू बाजारातून जनावरे खरेदी केली नाही.

4.520 पशुसंवर्धन अंतर्गत शेळी गट वाटप योजनेतील अनियमिततेबाबत

पंचायत समिती निलंगा, जिल्हा लातूर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 5)

पंचायत समिती निलंगाने सन 2021-22 मध्ये पशुसंवर्धन अंतर्गत शेळी गट वाटपासाठी एकूण 14 लाभार्थ्यांसाठी प्रती लाभार्थी रक्कम रुपये 77,659/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 10,87,226/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. लाभार्थीना दुबार लाभ दिला नसल्याबाबत, तसेच शेळी खरेदी केल्याने त्यांच्या जीवनमानात, उत्पन्नामध्ये भर पडल्याबाबत त्रैमासिक अहवाल सादर केल्याचे अभिलेखे उपलब्ध झाले नाही.

2. ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार लाभार्थी निवड प्रक्रिया राबविली नाही, जनावरे खरेदी करण्यापूर्वीच रक्कम खात्यात जमा केली आहे.

3. ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक मागास/1089/प्र.क्र.55, दिनांक 05/10/1989, नुसार मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असताना, अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थ्यांना इतर विभागाकडून राबविण्यात आलेल्या योजनेतून यापूर्वी लाभ दिलेबाबत तपासणी करता आली नाही.

4. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.305/पदुम-4 दिनांक 22/11/2011 नुसार राज्याबाहेरील नामांकित पशू बाजारातून शेळी खरेदी केली नाही.

5. ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2016/प्र.क्र.9/वित्त-9, दिनांक 19/05/2016, नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनांचा खर्च विहित कालमर्यादेत व त्याच आर्थिक वर्षात करणे आवश्यक असताना योजना वर्ष अखेरीस राबविल्याने पुढील आर्थिक वर्षात लाभ मिळाला आहे. 2 लाभार्थीची एकूण रक्कम रुपये 1,55,318/- त्यांच्या खात्यावर जमा न करता पशुधन विकास अधिकारी (वि.) पंचायत समिती निलंगा यांच्या नावे अदा केली आहे. ज्यामुळे शासनाची अखर्चित रक्कम वार्षिक लेख्याबाहेर राहिली असून पंचायत समिती कडून चुकीचा वार्षिक लेखा सादर केला आहे. अखर्चित रक्कम रुपये 1,55,318/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

*****